(57)

।। श्री ।।

# साईकृपा को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : एनबिओएम/सिडको/एचएसजी (ओएच) ७५० / जाटीआर सन -१९९८-९९

ए. टाईप, कंडोमिनीयम नं-६, सेक्टर - ९, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९.

संदर्भ क्र. साई २६/२२ — दिनांक : ०५/०५/२०२६

प्रति,
सर्व सभासद,
साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.

विषय: सोसायटीच्या प्रस्ताविक पुनर्विकास (Redevelopment) संदर्भातील टेंडर पाहणी व सूचना देण्याबाबत.

महोदय / महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या सोसायटीच्या पुनर्विकास प्रक्रियेसाठी दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण पुनर्विकास सभेत बहुमताने मंजूर केलेल्या प्रकल्प अहवालानुसार, PMC ने तयार केलेला मसुदा निविदा कागदपत्रे हे सोसायटी कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

सर्व सभासदांनी सोसायटी कार्यालयात येऊन सदर टेंडरची माहिती काळजीपूर्वक तपासावी व त्याबाबत आपल्या सूचना, मते किंवा हरकती लेखी स्वरूपात समितीकडे सादर कराव्यात, ही नम्र विनंती आहे,हे करत असतांना निविदेची गोपनीयता ठेवण्यात यावी.

तरी आपण सर्वांनी दिनांक **०६/०५/२०२६ ते २५/०५/२०२६** आत कार्यालयात भेट देऊन टेंडरची पाहणी करावी व आपले अभिप्राय समितीपर्यंत पोहोचवावेत. दिनांक २५/०५/२०२६ पर्यंत आलेल्या सूचना तसेच अभिप्राय यावर PMC बरोबर चर्चा करून, निविदा जाहिरात प्रतिष्ठित वर्तमान पत्रात देण्यात येईल. याबद्दल चे सूचना पत्र सर्व सभासदांना देण्यात येईल व संस्थेच्या नोटीस बोर्डवरही लावण्यात येईल. प्राप्त झालेल्या निविदांची नाव व सूची संस्थेच्या नोटीस बोर्डवर लावण्यात येईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.

आपल्या सर्वांच्या सूचना व सहभागामुळे पुनर्विकास प्रक्रिया अधिक पारदर्शक व योग्य पद्धतीने पार पडण्यास मदत होईल.

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नोंदणी क्रमांक: एनबीओएम/सिडको/एचएसजी (ओएच)/७५०/जेटीआर/सन १९९९
नवी मुंबई-४००७०९

आपला विश्वासू,

Moesane

सचिव
साईकृपा को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.